"नांदेड जिल्ह्यातील नगदी पिके उत्पादित शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास"

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड मानव्यविद्याशाखेतील 'अर्थशास्त्र' विषयाच्या विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीकरिता सादर करण्यात येणारा संशोधन आराखडा

संशोधक

शिंदे परमेश्वर चंद्रप्रकाश

संशोधन मार्गदर्शक

डॉ. भोसले एम. व्ही.

सामाजिक शास्त्रे संकुल, स्वा. रा. ती. म. विद्यापीठ, नांदेड

जुलै-२०२३

"नांदेड जिल्ह्यातील नगदी पिके उत्पादित शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास"

प्रस्तावना :

देशाच्या आर्थिक विकासात शेतीला अनन्यसाधारण महत्त्व असते शेती हा त्या देशाचा आर्थिक विकासाचा महत्वाचा आधारस्तंभ असतो. औद्योगिक विकासासाठी आवश्यक असणाऱ्या कच्च्या मालाचा पुरवठा आणि बाजारपेठ मिळविण्यासाठी शेतीचा विकास होणे आवश्यक असतो. उद्योगधंदे आणि शेती यात परस्परपुरक संबंध असतो. कारण शेतीमुळे उद्योगधंद्यामध्ये रोजगार उपलब्ध होऊ शकतो. कृषी क्षेत्राचा अपेक्षित विकास झाला तरच शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारेल, इतकेच नव्हे तर देशाच्या विकासाला त्यामुळे गती प्राप्त होईल.

अलीकडील काळात देशातील पीकरचनेत बदल होतांना दिसून येतो. पीक रचनेच्या अभ्यासात आर्थिक, तांत्रिक आणि संस्थात्मक घटकामध्ये बदल घडून आल्यास पीक रचनेत स्थिरत्व आणण्याची प्रवृत्ती विकसनशील शेतकऱ्यांमध्ये अधिक दिसून येते. यासाठी अधिक उत्पन्न देणाऱ्या पीकाच्या जाती व तंत्रज्ञानाची उपलब्धता शोधून काढणे आवश्यक आहे.

महाराष्ट्रातील शेती मागासलेली असून यासाठी जलसिंचन सुविधांची कमतरता हा घटक अधिक कारणीभूत असल्याचे दिसून येते. देशात ३६ प्रतिशत क्षेत्र जलसिंचनाखाली असून महाराष्ट्रात केवळ १६ प्रतिशत क्षेत्र जलसिंचनाखाली आहे. महाराष्ट्र राज्यात कोकण, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाडा या विभागाचा समावेश असून महाराष्ट्र राज्यातील मराठवाडा विभागाअंतर्गत येणारा नांदेड हा जिल्हा असून जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ १०५२८ चौ.कि.मी. असून ते

राज्याच्या भौगोलिक क्षेत्राच्या ३.४२% एवढे आहे. नांदेड जिल्ह्यात एकूण १६ तालुक्याचा समावेश होतो. जिल्ह्याच्या एकूण १०,४४,३५४ हेक्टर भौगोलिक क्षेत्रापैकी ९१,७४८ हेक्टर वनक्षेत्र असून त्याचे एकूण भौगोलिक क्षेत्राशी ८.७६ आहे. शेतीयोग्य नसलेले एकूण क्षेत्र ५८,६४४ हेक्टर असून पडीक जमीनी व्यतिरिक्त लागवडीलायक जमीन ३२,४६१ हेक्टर असून पडीक जमिनीपैकी ८०,३४४ चालू पड व इतर पड ६,६६० हेक्टर असून निव्वळ कसलेले क्षेत्रफळ ७,७४,४५४ हेक्टर एवढे आहे. नांदेड जिल्ह्याचे एकूण क्षेत्र १,३१,५७३ हेक्टर आणि निव्वळ त्यापैकी लागवड लायक क्षेत्र ७८४१२ हेक्टर एवढे आहे. २०११ जनगणनेनुसार नांदेड जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ३३,६१,२९२ एवढी आहे. २०११ च्या जनगणनेनुसार नांदेड जिल्ह्याच्या क्षेत्रफळाची तुलना करता लोकसंख्येची घनता ३२० व्यक्ती प्रती चौ. कि. मी. आहे.

नगदी पिके :

नगदी पिक म्हणजे असे पीक ज्या पिकांची विक्री करून शेतकऱ्याला नगदी/रोख (Cash) पैसे मिळतील. शेतकरी नगदी पिके प्रामुख्याने लवकर पैसे मिळतील व त्याचा उदरनिर्वाह भागेल या उद्‌देशाने घेतो. वेगवेगळ्या भागात वेगवेगळी नगदी पिके घेतली जातात. महाराष्ट्र राज्यात कापूस, ऊस, सोयाबीन, हळद ह्या नगदी पिकांची शेती केली जाते.

कापूस

कापूस हे एक तंतू पीक आहे व त्याला पांढरे सोने किंवा लोकर असेही म्हटले जाते. सुरुवातीला प्राचीन काळात इजिप्त मधील लोकांना कापसापासून कापड बनवण्याची कला अवगत होती.

कापूस पीक हे भारत, चीन, अमेरिका, पाकिस्तान, ब्राझील, उझबेकिस्तान, ऑस्ट्रेलिया, तुर्की, अर्जेंटिना, व ग्रीस या देशामध्ये घेतले जाते.

उत्पादनाच्या बाबतीत भारत देश अव्वल स्थानी आहे. तसेच भारतामध्ये महाराष्ट्र राज्य हे कापूस उत्पादनामध्ये अग्रेसर आहे. जुन्या सरकारी अहवाल नुसार कापसाच्या जगातील संपूर्ण क्षेत्रफळाच्या अंदाजे २५% क्षेत्र हे भारत देशाचे आहे व उत्पादनाच्या बाबतीत जगातील १६% कापूस हा भारत देशामध्ये तयार होतो.
कापसाच्या धाग्याचा वापर करून वेगवेगळी कापड तयार केली जातात. कापसाचा वापर वैद्यकीय क्षेत्रातही केला जातो. कापसाच्या बियांपासून तेल व जनावरांसाठी पेंड तयार केली जाते.

ऊस

हे पीक नगदी पीक म्हणून ओळखले जाते. भारताची ६५% लोकसंख्या शेतीमस्थानीध्ये गुंतलेली आहे. शती करते. भारतात जवळपास सर्व प्रकारचे पीक घेतले जातात.परंतु ऊस हे भारतातील सर्वात लोकप्रिय पिकांपैकी एक आहे. ऊस म्हणजे मुख्यतः साखर उत्पादनासाठी वापरले जाणारे.

जगात ब्राझील हा सर्वात मोठा ऊस उत्पादक(Sugarcane growers) देश आहे. भारतात ऊसाचे जास्त उत्पादन झाल्यामुळे भारत हा जगातील दुसरा सर्वात मोठा ऊस उत्पादक(Sugarcane growers) देश आहे.

सोयाबीन

सोयाबीन मध्ये नैसर्गिक प्रथिने (प्रोटीन) असते. सोयाबीन चे तेल आरोग्यास चांगले मानले जाते कारण या तेलात खूप कमी प्रमाणात सॅच्युरेटेड फॅटस असतात. सोयाबीन ला सोनेरी धाण्य असेही म्हटले जाते.सोयाबीन शेंगा देणाऱ्या पीका मध्ये येते.
सोयाबीन चे उत्पादन ब्राझील, अमेरीका, अर्जेटिना, चीन, भारत, पॅराग्वे, कॅनडा, व युक्रेन या देशांमध्ये घेतले जाते. आपल्या देशात मध्य प्रदेश, महाराष्ट्र, राजस्थान, कर्नाटक, तेलंगणा, आंध्रप्रदेश, गुजरात व छत्तीसगड या राज्यांमध्ये सोयाबीन ची शेती केली जाते. सोयाबीन मध्ये उच्च प्रतीचे प्रथिने (Protein) असतात. काही भागात प्राण्यांच्या व मनुष्याच्या मुख्य आहारात

सोयाबीनचा समावेश केला जातो. सोयाबीनच्या बियांपासून १७% तेल व ६३% जनावरांच्या आहारातील पेंड तयार केली जाते.

सोयाबीन मधुमेही रुग्णांसाठी फायद्याचे असते. यामध्ये स्टार्च चे प्रमाण नसते त्यामुळे मधुमेही रुग्ण प्रथिनांसाठी सोयाबिन चा वापर करू शकतो. सोयाबीन व गव्हापासून पासून सोया सॉस तयार केले जाते. सोया दूध, सोयाबीन ला उकडून, वाफवून, व भाजून पण खालल्या जाते.

हळद

हळद आपल्या स्वयंपाक घरातील खूप महत्वपूर्ण गोष्ट आहे. हळद हि एक मसाल्यातील प्रमुख घटक आहे. हळदीला देश विदेशातून खूप मागणी आहे म्हणूनच हळद हे भरमसाठ पैसे देणारे एक नगदी पीक आहे. हळदीला पिवळे सोने असेही संबोधले जाते. संपूर्ण जगामध्ये जेवढी हळद वापरली जाते त्या पैकी ७५% ते ८०% हळद हि आपल्या भारत देशामध्ये तयार होते.

हळद हि एक जिंजर फॅमिली मधील वनस्पती आहे. तिचे वनस्पती नाव कुर्मा लोंगा हे आहे. देशात आंध्रप्रदेशात सर्वात जास्त हळदीचे उत्पादन घेतले जाते. ओरिसा, तामिळनाडू, आसाम, कर्नाटक, व महाराष्ट्र राज्यात हळदीची लागवड व उपादन घेतले जाते.

विषयाची निवड :

भारताच्या अर्थव्यवस्थेतील शेतीचे महत्वपूर्ण स्थान लक्षात घेता नांदेड हा महाराष्ट्रातील मराठवाडा विभागातील महत्वाचा जिल्हा असल्यामुळे नगदी पिकांमुळे कृषी अर्थव्यवस्थेवर काय परिणाम झाला हे जाणून घेण्यासाठी प्रस्तुत अभ्यास विषयाची निवड करण्यात आली आहे. शिवाय कृषी विकास व शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती याचा घनिष्ट संबंध असल्यामुळे कृषी विकासाच्या संदर्भात नगदी पिकांची जिल्ह्यात काय परिस्थिती आहे याचा व्यवस्थित अभ्यास करण्यात येणार आहे.

वाढत्या लोकसंख्ये बरोबर पिकाखालील क्षेत्रा मध्ये बदल घडून येत आहे. पारंपारिक पिका ऐवजी व्यापारी, उत्पादन पिकाच्या क्षेत्रफळात वाढ होत आहे. त्या दृष्टीकोनातून नांदेड जिल्यातील नगदी पिके उत्पादित शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास या विषयाची निवड करण्यात आली आहे.

संशोधनाचे महत्व :

महाराष्ट्र राज्याच्या नांदेड जिल्ह्यातील नगदी पिके उत्पादित शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास खुप महत्वाचा ठरणार आहे. प्रामुख्याने मराठवाड्यातील शेतकरी मागील काही वर्षापासून सतत दुष्काळाचा सामना करत असताना पारंपारिक पिकांना पर्याय म्हणून नगदी पिकांना पसंती देत आहेत. नगदी पिके साधारणतः कमी पाण्यावर येणारी रोख पिके म्हणून शेतकरी नगदी पिकांच्या उतदनाकडे वळत आहेत.

नगदी पिके हि महत्वाचे उत्तम अर्थार्जन करणारे पिके असल्या मुळे अनेक शेतकरी नगदी पिकांच्या लागवडी कडे वळले आहेत. नगदी पिके घेणाऱ्या शेतकऱ्यांना येणाऱ्या आडचणी बाबत मार्गदर्शन करण्यासाठी विषयाची निवड महत्वाची ठरते.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :

१) नांदेड जिल्ह्यातील नगदी पीक घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

२) नगदी पिकांच्या उत्पादन खर्चाचा अभ्यास करणे.

३)नांदेड जिल्ह्यातील नगदी पिकांच्या उत्पादन व उत्पादकतेचा अभ्यास करणे.

४) नांदेड जिल्ह्यातील नगदी पिकांच्या उत्पादनाला मिळणाऱ्या किमतीचा अभ्यास करणे.

५) नगदी पिकांच्या उत्पादनातून जिल्ह्याच्या कृषी विकासात व शेतकऱ्यांच्या जीवन मानात सुधारणा झाली आहे का ? याचा अभ्यास करणे.

६) जिल्ह्यात नगदी पिकांच्या उत्पादनामुळे उद्योगधंद्यात किती वाढ झाली आहे हे अभ्यासणे.

७) नगदी पीक घेण्यासाठी शेतकऱ्यांना येणाऱ्या आडचणीचा शोध घेऊन त्यावर उपाययोजना सुचवणे.

संशोधनाची गृहीतकृत्ये :

१) नांदेड जिल्ह्यातील नगदी पीक घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत वृद्धी होत.

२) नगदी पिक उत्पादक शेकऱ्यांच्या उत्पादन आणि उत्पादकतेत वाढ होत आहे.

३) नांदेड जिल्ह्याच्या पिक आकृती बंधात अन्नधान्य पिकांकडून नगदी पिकांकडे बदल होताना दिसत आहे.

४) नगदी पिकांच्या उत्पादनामुळे कृषी क्षेत्राच्या विकासावर अनुकूल परिणाम होताना दिसतो.

५) नांदेड जिल्हयात तालुका निहाय नगदी पिकांच्या उत्पादकतेत ताफावत आहे.

६) नांदेड जिल्हयातील नगदी पीक घेणारे शतेकऱ्यांच्या उत्पन्ना मध्ये वाढ होत आहे.

७) नांदेड जिल्हयातील नगदी पीक घेणारे शेतकरी हे नवीन तंत्रज्ञानाशी जुडले गेले आहेत.

संशोधन पद्धती :-

प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी सामाजिक शास्त्रातील संशोधन पद्धतीनुसार सर्वेक्षणात्मक तसेच विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येईल. तथ्य संकलनासाठी प्राथमिक सामग्री आणि दुय्यम सामग्री या दोन्ही प्रकारचा अवलंब करण्यात येईल.

तथ्य संकलनाच्या पद्धती :-

प्राथमिक पद्धत:

प्रस्तुत विषयाच्या संशोधन कार्याची अचूक माहिती मिळविण्यासाठी प्राथमिक पद्धतीचा अवलंब करण्यात येईल. प्राथमिक पद्धतीमध्ये प्रश्नावली या साधनाचा वापर माहिती संकलनासाठी करण्यात येईल.

दुय्यम पद्धत :-

प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी प्राथमिक सामग्री बरोबरच दुय्यम सामग्रीचा वापर करून सामग्रीचे संकलन केले जाईल. त्यामध्ये प्रकाशित व अप्रकाशित कागदपत्रे, दैनिके, मासिके, कार्यालयीन अहवाल तसेच इंटरनेट वरील माहिती इत्यादी साधनाचा वापर केला जाईल.

तसेच संशोधनातील निष्कर्षाच्या सादरीकरणासाठी आवश्यक तेथे सांख्यिकी तंत्राचा वापर केला जाईल. तसेच स्तंभालेख, सरासरी गुणोत्तर, टक्केवारी या सांख्यिकिय साधनांचाही आवश्यकतेनुसार वापर केला जाईल.

नमुना निवड :-

"नांदेड जिल्ह्यातील नगदी पिके उत्पादित शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास" या विषयावरील संशोधनासाठी साधा यादृच्छिक नमुना निवड पद्धतीचा अवलंब करण्यात येईल.

साधा यादृच्छिक नमुना निवड पद्धतीच्या आधारे नांदेड जिल्ह्यातील नगदी पिके घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थिती बाबतीत सखोल अभ्यास केला जाईल. सदरच्या संशोधनात वस्तुनिष्ठता यावी या उद्देशाने नांदेड जिल्ह्यातील १६ तालुक्यातील प्रत्येक चार गावातील प्रत्येकी ५ शेतकरी म्हणजे एकूण ३२० नगदी पिके घेणाऱ्या शेतकऱ्यांचा सखोल अभ्यास केला जाणार आहे.

नांदेड जिल्ह्यातील नगदी पिके उत्पादक शेतकऱ्यांच्या शेती विकासाबरोबर त्याच्या एकंदरीत जिवनमानाचा आर्थिक दृष्टीकोनातून अभ्यास करण्यासाठी प्रातिनिधीक स्वरूपात एकूण १६ तालुक्यातील प्रत्येकी चार नगदी पिके उत्पादक गावातील प्रत्येकी ५ शेतकऱ्यांच्या साधारण ३२० अनुसूचीद्वारे व प्रत्यक्ष मुलाखती घेऊन माहितीचे संकलन केले जाणार आहे.

संशोधनाची व्याप्ती :-

नांदेड जिल्ह्यातील नगदी पिके उत्पादित शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास सन २०१८-१९ ते २०२३-२४ या संशोधन विषयाची व्याप्ती नांदेड जिल्ह्यापूरती मर्यादित असणार आहे. तसेच नांदेड जिल्यातील

१) कापूस

२) ऊस

३) सोयाबीन

४) हळद

या प्रमुख चार नगदी पिकांपुरते मर्यादित असेल.

संशोधन कालावधी :-

नांदेड जिल्ह्यातील नगदी पिके उत्पादित शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास सन २०१८-१९ ते २०२३-२४ असा ०५ वर्षाचा कालखंड निश्चित करण्यात आलेला असून संशोधन विषयाला अनुसरून सर्व बाजूंनी या ०५ वर्षाच्या काळातील सविस्तर अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

आकडेवारीचे विश्लेषण :-

प्रस्तुत विषयाच्या संशोधनातील आकडेवारीचे विश्लेषण करण्यासाठी गणितीय आणि सांख्यिकीय साधनांचा वापर करण्यात येईल. जसे शेकडेवारी, वृद्धिदर, सहसंबंध, प्रतिगमन, T चाचणी इत्यादी सामग्रीचे विश्लेषण करण्यासाठी सारणी, तक्ते आणि आलेखाचाही उपयोग करण्यात येईल.

प्रकरणाची मांडणी :-

प्रस्तुत प्रबंधाचे नियोजन खालील प्रकरणाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.

प्रकरण पहिले : प्रस्तावना :-

प्रस्तुत प्रकरण हे अभ्यास विषयाच्या प्रस्तावनेशी संबंधीत असुन प्रस्तुत प्रकरणात नगदी पिकांविषयीचा इतिहास, महत्त्व, विषय परिचय, विषय निवडीची आवश्कता, याचा सविस्तर अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे : संशोधन साहित्याचा आढावा आणि संशोधन पद्धती :

प्रस्तुत प्रकरण हे प्रस्तुत विषयाशी संबंधित असेल, यामध्ये वेगवेगळ्या अभ्यासक्रमांनी, विचारवंतांनी मांडलेल्या संशोधनात्मक लिखानाचा किंवा निष्कर्षाचा आधार घेऊन संशोधन साहित्याचा आढावा घेतला जाणार आहे. तसेच संशोधनाची उद्दिष्टे, गृहितके, संशोधन कालखंड, तथ्य संकलन पद्धती, व्याप्ती, संशोधनाच्या मर्यादा संशोधन पद्धतीमध्ये प्राथमिक व दुय्यम माहितीचे स्त्रोत, संशोधन कार्यक्षेत्र, संशोधन विश्लेषणाची साधने, अभ्यास विषयाचे महत्त्व आणि अभ्यासाची मर्यादा यांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे : नांदेड जिल्ह्याच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीचा अभ्यास :-

प्रस्तुत प्रकरणात नांदेड जिल्हयाच्या सामाजिक व आर्थिक स्थितीच्या अभ्यासाबरोबर नांदेड जिल्हयाचे भौगोलिक क्षेत्रफळ व स्थान, पर्वतरांगा, नद्या, मृदा, हवामान व पर्जन्यमान, लोकसंख्या स्त्री-पुरुष प्रमाण, साक्षरता जमिनीचा वापर, पीक रचना, जलसिंचन कृषी अवजारे, जमिनीचा प्रकार, सिंचनचे स्त्रोत, वाहतूक सोई, उद्योगधंदे या विषयीचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे : नांदेड जिल्हयातील नगदी पिकांच्या पिक रचनेचा अभ्यास :-

प्रस्तुत प्रकरणामध्ये नांदेड जिल्हयातील सन २०१८-१९ ते २०२३-२४ पर्यंतचे तालुका निहाय नगदी पिकांच्या पिक रचनेचा अभ्यास करण्यात येणार आहे. त्यात नगदी पिकाखालील क्षेत्र व पीक रचनेत झालेल्या बदलांचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण पाचवे : नगदी पिकांमुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत झालेल्या बदलाचा अभ्यासः-

या प्रकरणात शेतकऱ्याच्या आर्थिक स्थिती व उत्पन्न राहणीमानाचा प्रश्नावली च्या साहयाने गोळा केलेल्या माहितीच्या आधारे आढावा घेण्यात येईल.

प्रकरण सहावे : निष्कर्ष व शिफारशी :- या प्रकरणात अभ्यासांचा सारांश, निष्कर्ष आणि त्या अनुषंगाने धोरणात्मक उपाय व शिफारशी सुचविण्यात येतील.

संदर्भ :

१. डॉ.मुंडे टी.व्ही. २००२ मराठवाड्यातील पिकांच्या आकृतीबंधाचा अभ्यास.

देसाई आर.जी., ॲग्रीकल्चर इकॉनॉमिक्स

३. सातपानी टी., इरीगेशन ॲन्ड इकॉनॉमिक डेव्हलपमेंट

४. देवळे सी.डी., वाघमारे पी.आर., स्टडी ऑफ क्रॉपिंग पॅटर्न चेंजेस इन नांदेड डिस्ट्रीक्ट ऑफ महाराष्ट्र.

५. शास्त्रीय संशोधन पद्धती, डॉ. बी. एम. कऱ्हाडे

६. सिंग १९५२, क्रॉप पॅटर्न, इन अ प्लॅन्ड इकॉनॉमी इंडियन जर्नल ऑफ ॲग्रीकल्चर इकॉनॉमिक्स.

७. विजयकर डी. ए. ई.स. २०१९, नांदेड जिल्ह्यातील हळदीच्या पिकाचे अर्थशास्त्रीय अध्ययन-संशोधन आराखडा

८.माथुर पी.एन. १९५५, क्रापींग पॅटर्न इम्पलॉयमेन्ट इन विदर्भ रीजन इंडियन जर्नल ऑफ ॲग्री इकॉनॉमिक्स.

९. शिनगारे एम.के. आणि वाघमारे आए. ई. १९६८ इन्डीकेट ॲन्ड लिनीअर ग्रोथ रेटस ऑफ इरिगेशन एकरेज अंडर प्रिन्सिपल क्रॉप इन महाराष्ट्र ॲग्रीकल्चर सिच्युएशन इन इंडिया.

१०. शर्मा आणि जोशी १९७०, महाराष्ट्रातील उच्च पैदास बियाणाचा अभ्यास.

११. https://nagdipike.in

१२. www.nanded.nic.in

१३. www.agri.mah.mic.in

१४. www.maharashtra.gov.in

संशोधक — मार्गदर्शक

शिंदे परमेश्वर चंद्रप्रकाश — डॉ. भोसले एम. व्ही.